

स्थापना : जून १९७२

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित व
कायम संलग्नित डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद


NAAC Re-Accredited (3rd Cycle) with B++ Grade
ISO 21001:2018 EOMS Certified
ISO 14001:2015 Environmental Management System Certified
Energy Audited

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई

अंबाजोगाई - ४३१५१७

## कनिष्ठ महाविद्यालय
## माहिती पुस्तिका
## २०२२-२३





**मा.आ.श्री. प्रकाशदादा सुंदरराव सोळंके**

अध्यक्ष

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबाद



**मा.आ.श्री. सतीशभाऊ भानुदासराव चव्हाण**

सरचिटणीस

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबाद



**मा. श्री. दत्तात्रय ज्ञानोबाराव पाटील**

केंद्रीय कार्यकारणी सदस्य, म.शि.प्र.मंडळ औरंगाबाद

तथा कार्यकारी सदस्य, महाविद्यालय विकास समिती य.च.म. अंबाजोगाई

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई

## जि.बीड-४३१५१७

(कायम संलग्नित डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद)

NAAC Re-Accredited (3rd Cycle) with B++ Grade
ISO 21001:2018 EOMS Certified
ISO 14001:2015 Environmental Management System Certified
Energy Audited

Ph. : 02446-247049
Fax : 02446-243049
E-mail : yccambajogai@gmail.com
Website : www.yccmamb.in
Fecebook : Yeshwantrao Chavan

: प्रकाशक :

प्राचार्य डॉ. शिवदास झेड. शिरसाठ

## * अनुक्रम *


| अ.क्र. | घटक | पान क्र. |
|---|---|---|
| १) | प्राचार्यांचे मनोगत | १ |
| २) | महाविद्यालयाची वैशिष्ट्ये | २ |
| ३) | कनिष्ठ महाविद्यालयातील कला,वाणिज्य व विज्ञान शाखेचा अभ्यासक्रम | ७ |
| ४) | प्रवेशासंबंधी नियम | ८ |
| ५) | परीक्षेस बसण्यासंबंधी नियम | ८ |
| ६) | विविध शिष्यवृत्त्या व आर्थिक सहाय्य | ८ |
| ७) | गणवेश | १२ |
| ८) | ओळखपत्र एक महत्वाची बाब | १२ |
| ९) | ११ वी निकालाची पद्धत | १३ |
| १०) | प्रवेश फीस बाबत | १४ |
| ११) | प्रवेश व उपस्थिती बाबत | १५ |
| १२) | ग्रंथालया बाबत | १५ |
| १३) | विविध वर्गातील प्रवेशांसाठीचे आरक्षण तक्ता | १८ |
| १४) | गुणवंत विद्यार्थ्यांसाठी बक्षीस योजना | १९ |
| १५) | कनिष्ठ महाविद्यालयीन उपक्रमांचे वार्षिक नियोजन | २० |
| १६) | कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद | २१ |
| १७) | प्रशासकीय कर्मचारी वृंद | २२ |

# * प्राचार्यांचे मनोगत *

**विद्यार्थी मित्रांनो !**

जून १९७२ मध्ये आपल्या यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाची सुरुवात अंबाजोगाई शहरात झाली. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ औरंगाबाद या नावलौकिक कमावलेल्या आणि राज्य शासनाने गौरवलेल्या संस्थेने ही शैक्षणिक सुविधा अंबाजोगाई आणि ग्रामीण परीसरास उपलब्ध करून दिले. अंबाजोगाई शहरातील एका मठात सुरुवात झालेल्या आणि नंतर मुकुंदराज विद्यालयात काही काळ सुरू राहिलेले महाविद्यालय आता स्वत:च्या मालकीच्या बारा एकर परिसरात आपल्या सुसज्ज इमारतींनी कार्यरत आहे. सुरुवातीला आपले महाविद्यालय केवळ 'कला व वाणिज्य' या दोनच शाखेचे कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय होते. काळ बदलत गेला तसतसे नवनवे बदल स्वीकारत अस्तित्वात असलेल्या शाखांमध्ये पदव्युत्तर स्तरावर इंग्रजी, अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र विषयांच्या शिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्यात आली. त्यानंतर वाणिज्य शाखेचेही पदव्युत्तर शिक्षण उपलब्ध करुन देण्यात आले. त्यात नव्याने कनिष्ठ तथा वरिष्ठ स्तरावर विज्ञान शाखेचीही भर पडली. आज महाविद्यालयात कला,वाणिज्य आणि विज्ञान अशा तीनही शाखा कनिष्ठ, वरिष्ठ व पदव्युत्तर स्तरावर कार्यरत आहेत. आपल्या महाविद्यालयात इंग्रजी, राज्यशास्त्र व अर्थशास्त्र विषयाचे पीएच.डी. चे संशोधन केंद्र असून समाजशास्त्र, हिंदी व मराठी विषयामध्ये पीएच.डी. करण्यासाठी मार्गदर्शक आहेत. या शिक्षण आणि संशोधनाच्या सुविधेचा थेट लाभ आपल्या परीसरातील ग्रामीण तथा शहरी भागातील विद्यार्थ्यांना होतो आहे.

गुणवत्तेचा स्तर वरचेवर उंचावत आपल्या महाविद्यालयाने सलग तीन वेळा नॅक या बँगलोर येथील संस्थेकडून मानांकन व मूल्यांकन करुन घेतले आहे. आपल्या महाविद्यालयाला बी++ हा दर्जा प्राप्त झालेला आहे. आपले महाविद्यालय 'इन्हॉरमेंटल मॅनेजमेंट सिस्टीम', एनर्जी ऑडीट व 'आय.एस.ओ. मानांकित' आहेच, याचाही आपल्याला अभिमान आहे.

- २०२१–२२ हे शैक्षणिक वर्ष आपल्या महाविद्यालयाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष म्हणून आपण साजरे करण्यात आले. या अनुषंगाने महाविद्यालयात विविध शैक्षणिक, सहशैक्षणिक व शिक्षणेत्तर उपक्रमांसह नवीन काही कालसुसंगत उपक्रम राबविण्यात येत आहेत.
- ग्रामीण भागातील पालक आणि विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार 'सैनिक/ पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र' सुरू करण्यात आले आहे. ज्याचा थेट उपयोग विद्यार्थ्यांना पोलीस आणि सैन्यदलात भरतीसाठी होणार आहे.
- वरिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर विज्ञान शाखेत 'सुक्ष्मजीवशास्त्र' हा विषय नव्याने सुरू करण्यात आला आहे.
- सुवर्ण महोत्सव वर्ष निमित्ताने आमच्या महाविद्यालयातील निसर्गरम्य परीसरात वड, पिंपळ, कडुलिंब या प्रजातींचे अनेक नवीन वृक्षारोपण करण्यात आले आहे. त्यामुळे कोवीडच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनाला मोठा हातभार लागला आहे व महाविद्यालयाची ओळख 'प्रदुषणमुक्त परीसर' म्हणून घट्ट झाली आहे.
- विद्यार्थ्यांच्या क्रीडा क्षेत्रातील कौशल्य विकासासाठी सुसज्ज असे इनडोअर व आउटडोअर स्टेडीयम महाविद्यालयातील विद्यार्थीसोबतच परिसरातील नगरवासियांनाही त्याचा वापर होतो आहे. ही अभिमानास्पद गोष्ट आहेच.
- महाविद्यालयाचे सुसज्ज ग्रंथालय संगणकीकृत असून विद्यार्थी, विद्यार्थिनी आणि प्राध्यापकांसाठी स्वतंत्र वाचन कक्षाची उपलब्धता आहे.

गुणवत्तापूर्ण प्राध्यापकवृंद, तळमळीने कार्य करणारे कार्यालयीन कर्मचारी आणि या महाविद्यालयाच्या पालकाच्या भूमिकेत असलेले आदरणीय आमदार मा. प्रकाशदादा सोळंके संस्थेचे अध्यक्ष आहेत आणि सरचिटणीसपदी मराठवाडा पदवीधर मतदार संघाचे सन्मानणीय आमदार मा. सतीशभाऊ चव्हाण आहेत. त्याग आणि समर्पणाच्या भावनेने मराठवाड्यात कार्यरत असलेल्या सर्व शाळा व महाविद्यलाचा शैक्षणिक स्तर उंचावण्यासाठी ही मान्यवर मंडळी आणि त्यांचे सर्व सहकारी आपल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध आहेत, याचा आम्हांला अभिमान वाटतो.

शिक्षण, सहशिक्षण व शिक्षणेत्तर उपक्रमांनी आपण सातत्याने विद्यार्थ्यांचे भरणपोषण करत आलो आहेत, त्याचे प्रबलीकरण करण्याचे या निमित्ताने मी आपणास आश्वासीत करतो व आपल्या महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी हार्दिक स्वागत करतो.

**प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ**

# * महाविद्यालयाचे वैशिष्ट्ये *

## * नियमित अध्ययन व अध्यापन :

महाविद्यालयामध्ये अध्ययन व अध्यापनाची प्रक्रिया जागतिक स्पर्धेच्या युगात संदर्भ मूल्य म्हणून रहावी, म्हणून महाविद्यालयात या प्रक्रियेमध्ये पारंपारिक व्याख्यान पद्धती बरोबरच आधुनिक साधनांचाही उपयोग केला जातो. तसेच विद्यार्थ्यांना विषयाचा स्वतंत्रपणे वेध घेता यावा म्हणून ही प्रयत्न केले जातात. यात त्यांचे यथार्थ मूल्यमापन व्हावे, स्वयं परीक्षण व्हावे आदी हेतूने पुढील पद्धतीचा उपयोग केला जातो.

१) व्याख्यान पद्धती २) चर्चासत्र / शोधनिबंध लेखन व वाचन ३) गटचर्चा ४)सर्वेक्षण

५) कथा,कविता,निबंध आदी वाङमयीन स्पर्धा ६) सत्र परीक्षा ७)वर्ग चाचणी व गृहपाठ ८) विस्तार व्याख्यानमाला ९) तज्ञ व्यक्तींची व्याख्याने १०) प्रत्याभरण (Feedback)

## * कनिष्ठ महाविद्यालयाचा यशवंत पॅटर्न :

अकरावी व बारावी कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांची नियमित तासिके व्यतिरिक्त जास्तीच्या तासिका आणि सराव परीक्षा घेवून विशेष तयारी करून घेतली जाते. यामुळे महाविद्यालयाचे अनेक विद्यार्थी उच्च माध्यमिक मंडळ परीक्षेत गुणवत्ता यादीत चमकले आहेत व बहुसंख्य विद्यार्थी विशेष प्राविण्याने उत्तीर्ण झालेले आहेत. यशवंत पॅटर्न अंतर्गत अकरावी व बारावी विज्ञानशाखेत विशेष कोचिंग केली जाते. तसेच उन्हाळी वर्गांचे आयोजन केले जाते. वैद्यकिय व अभियांत्रिकी पूर्व परीक्षेचे विशेष तयारी वर्ग चालविले जातात. यशवंत पॅटर्नमुळे बीड जिल्ह्यातून या महाविद्यालयाचे बहूसंख्य विद्यार्थी बी.ई./पॉलिटेक्निक/डी.एड्./ बी. फार्म./डी फार्म साठी पात्र ठरले आहेत.

## * समृध्द ग्रंथालय :

महाविद्यालयाचे ग्रंथालय वैचारिक ग्रंथांनी समृद्ध आहे. ग्रंथालयात इंग्रजी, हिंदी, मराठी, पाली आदी भाषांतील अभिजात व आधुनिक साहित्यासह सर्व सामाजिक शास्त्रे, वाणिज्य, कला, संस्कृती व इतर विविध विषयांवरील ग्रंथसंपदा जवळपास पस्तीस हजार पेक्षा जास्त पुस्तकांची आहे. ग्रंथालयात क्रमीक पुस्तकांबरोबरच सर्व विषयांची संदर्भग्रंथही उपलब्ध आहेत. या ग्रंथालयाला जोडूनच प्राध्यापक, विद्यार्थी व विद्यार्थीनींसाठी स्वतंत्र अभ्यासिका व वाचनकक्षही आहे. वाचनकक्षात सर्व वृत्तपत्रे, नियतकालिके व अन्य अभ्यासपुरक साहित्य विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले जाते. विज्ञान विभागातील ११ वी व १२ वी मधील विद्यार्थ्यांसाठी (MCQ) बहूपर्यायी प्रश्न संच उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

**Neet व Jee** क्लासेस घेतले जातील.

### ❋ सुसज्ज प्रयोगशाळा :

भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, भूगोल व संगणकशास्त्र या विषयांच्या प्रयोगशाळा अत्याधुनिक उपकरणाने सुसज्ज आहेत.

### ❋ चर्चासत्रे, परिषदा, शोधनिबंधलेखन कार्यशाळा व उद्‌बोधन शिबीरे :

महाविद्यालयात राष्ट्रीय, राज्य व विभागीय स्तरांवर चर्चासत्रांचे आणि परिषदांचे आयोजन, प्राध्यापक, विद्यार्थी यांच्यात विचार व ज्ञानाची आदानप्रदान व्हावी या हेतूने केले जाते. महाविद्यालयीन स्तरांवर चर्चासत्रांचे, परिषदा, कार्यशाळा व उद्‌बोधन शिबीरांचे आयोजन केले जाते.

### ❋ शैक्षणिक सहल :

केवळ पुस्तकी ज्ञानातूनच विद्यार्थ्यांना ज्ञानाची प्राप्ती होत नसते. उघड्या डोळ्यांनी प्रवास करून डोळस दृष्टीने जग पाहिल्यास खऱ्या खुऱ्या ज्ञानाची प्राप्ती होते. या हेतूने महाविद्यालयाच्या वतीने त्या त्या विषयांअतर्गत शैक्षणिक सहलीचे आयोजन केले जाते. यासाठी प्रवास सवलत दिली जाते.

### ❋ राष्ट्रीय छात्रसेना (एन.सी.सी.) :

महाविद्यालयात राष्ट्रीय छात्रसेनेचे युनिट कार्यरत आहे. राष्ट्रीय छात्रसेनेचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये प्रखर राष्ट्रवादाची भावना निर्माण करून सैनिक पूर्व प्रशिक्षण विद्यार्थ्यांस देणे हा आहे. राष्ट्रीय छात्र सेनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना देश संरक्षण, व्यक्तिमत्व विकास, शिस्त, नेतृत्व निर्मिती इ. गुणांचे आविष्करण केले जाते. एन.एसी.सी. प्रमाणपत्राचा उपयोग लष्करातील सरळ प्रवेशासाठी मान्य आहे. एन.सी.सी. च्या वतीने वर्षभरात बी.एल.सी. ट्रेनिंग कॅंप, टी.सी., पॅरासिलिंग, आर.डी., ए.टी.सी., एन.आय.सी.,रक्तदान, वृक्षारोपन, ज्वलंत विषयावरील जनजागरण अभियान राबविले जातात. ज्या विद्यार्थ्यांना एन.सी.सी. मध्ये प्रवेश घ्यावयाचा आहे त्यांनी एन.सी.सी. अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.

### ❋ क्रीडा विभाग :

जिमखाना, इन्डोअर व आऊटडोअर क्रिडा प्रकारांसाठी महाविद्यालयात स्वतंत्र क्रिडा विभाग आहे. विद्यार्थ्यांची विविध खेळांची तयारी करून घेतली जाते. तसेच विद्यार्थ्यांत खेळाची आवड निर्माण व्हावी म्हणून क्रीडा विभाग सातत्याने प्रयत्न करतो. विद्यापीठ, राष्ट्रीय, राज्य, विभाग, जिल्हा स्तरांवर आयोजित सर्व प्रकारच्या क्रीडा स्पर्धेत महाविद्यालयाचे विद्यार्थी सहभागी व्हावेत, त्यातील प्राविण्य व गुणवत्ता प्राप्त करावी या दृष्टीने सर्व साधने, उपकरणे आणि प्रशिक्षण उपलब्ध करुन दिले जाते. जे विद्यार्थी अशा स्पर्धेतून यश संपादन करतील अशा सर्व विद्यार्थ्यांचे वार्षिक स्नेहसंमेलनामध्ये यथोचित गौरव केला जातो.

**✻ यशवंत व्यायाम शाळा :**

महाविद्यालयात सर्व आधुनिक व शास्त्रीय साधनाने युक्त अशी व्यायामशाळा प्रशिक्षकासहित उपलब्ध आहे. ज्या विद्यार्थ्यांना विविध क्रीडा प्रकारात रस आहे त्यांनी क्रीडा प्रमुखांशी संपर्क साधावा.

**✻ इंडोअर आणि आउटडोअर खेळांची सुविधा :**

महाविद्यालयातील इन्डोअर आणि आउटडोअर स्टेडियमच्या माध्यमातून बुद्धीबळ, शटल कॉक, कॅरम, मॅट कुस्ती, टेबल टेनिस, ॲथलेटिक्स, जिमनॅस्टिक्स, सायकलिंग, फुटबॉल, हॉकी, व्हॉलीबॉल आदी खेळांची सुविधा उपलब्ध आहे.

## ✻ सांस्कृतिक विभाग :

महाविद्यालयाचा सांस्कृतिक वारसा समृद्ध आहे. विद्यार्थ्यांचा कलात्मक विकास व्हावा या दृष्टीने सांस्कृतिक विभाग सातत्याने वर्षभर प्रयोगशील व प्रयत्नशील असतो. सर्व प्रकारच्या आयोजित वाद–विवाद स्पर्धा, नाट्यस्पर्धा, अभिनय प्रकार, संगीत, कला इ. मध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी आपला सहभाग नोंदवतात. सांस्कृतिक विभाग विद्यार्थ्यांच्या दृष्टीने समृद्ध व्हावा म्हणून खालील मंडळे स्थापन केली आहेत.

१) भाषा व वाङ्मय मंडळ
२) सामाजिक शास्त्रे मंडळ
३) वाणिज्य मंडळ
४) विज्ञान मंडळ

या मंडळांच्या वतीने वर्षभर हाउस पब्लिकेशन्स प्रकाशित केले जातात.

## ✻ वाङ्मय मंडळ :

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी विविध उपक्रमांसोबत महाविद्यालयाचे वाङ्मय मंडळ विद्यार्थ्यांच्या वाङ्मयीन जाणीवा समृद्ध करण्यासाठी प्रयत्न करते. वाङ्मयाशी संबंधीत विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना कथा, कविता, कादंबरी, नाटक आदी बाबतीत सखोल ज्ञान दिले जाते. विद्यार्थी लिहिते बोलते करण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. कथा, कविता, निबंध लेखन स्पर्धा विद्यार्थ्यांना अधिक संवेदनशील बनवतात. वाद–विवाद, भाषण आणि संभाषण कौशल्य विकसित करण्यासाठी मंडळ सर्वतोपरी प्रयत्न करते. महाविद्यालयातील मराठी,हिंदी,इंग्रजी व पालि विभागाचे विद्यार्थी व प्राध्यापक या मंडळात सहभागी असतात.

## ✻ स्वतंत्र व सुसज्ज वसतिगृह :

महाविद्यालयातील गरीब व होतकरु विद्यार्थीनींसाठी यु.जी.सी. अंतर्गत स्वतंत्र व सुसज्ज वसतिगृह बांधण्यात आले आहे. वसतिगृहात मुलींच्या राहण्याची, जेवणाची आणि अभ्यासाची उत्तम सोय रण्यात आली आहे.

## ※ व्यवसाय मार्गदर्शन व स्पर्धा परीक्षा केंद्र :

विद्यार्थ्यांना या महाविद्यालयात पारंपारिक अभ्यासक्रम व्यवस्थितरित्या पूर्ण करण्याबरोबरच विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाट मोकळी करून देण्यासाठी केंद्र चालविले जाते. या केंद्रात पदवी शिक्षणाबरोबरच विविध व्यवसायांचे आणि विविध नोकऱ्यांतील संधीचे तज्ञाकडून मार्गदर्शन केले जाते. स्पर्धा परीक्षेची पूर्व तयारी करण्यासाठी ग्रंथ व नियतकालिके उपलब्ध करून दिले जातात. स्पर्धा परीक्षांचे आयोजन केले जाते. तज्ञ प्राध्यापकांकडून त्या–त्या विषयांचे मार्गदर्शन केले जाते. सेट–नेट परीक्षा देवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयात मार्गदर्शन वर्ग आयोजित केले जातात.

## ※ वार्षिक अंक :

महाविद्यालयाच्या वतीने वार्षिक अंक प्रकाशित करण्यात येईल. हा अंक मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेतील असेल. वार्षिक अंक प्रकाशित करण्यामागील प्रधान हेतू असा आहे की, उद्याचे लेखक, कवी, विचारवंत, भाष्यकार निर्माण व्हावेत, त्याच्या प्रतिभेला येथेच अंकुर फुटावेत, त्यांची वैचारिक मशागत व्हावी आणि अंतिमतः त्यांची प्रतिभा आणि साहित्यिक अभिरुची समाजासमोर यावी हा आहे.

## ※ एस.टी. बस. पासेसची सुविधा :

महाविद्यालयात प्रवेश घेणारे बहुतांश विद्यार्थी ग्रामीण भागातील आहेत. काही विद्यार्थी दररोज गावी ये–जा करून महाविद्यालयात उपस्थित असतात. अशा विद्यार्थ्यांना एस.टी. बस पासची सवलत दिली जाते. यासाठी महाविद्यालय विद्यार्थ्यांना सहकार्य करते. विद्यार्थ्यांना दिवाळी व उन्हाळ्याच्या सुट्टीसाठी बस कन्सेशनची सुविधा आहे. तसेच विद्यार्थीनींसाठी विशेष सवलतीच्या दरात एस.टी.पासची सुविधा आहे.

## ※ कमवा आणि शिका योजना :

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने गरीब व होतकरु विद्यार्थ्यांसाठी 'कमवा आणि शिका' योजना महाविद्यालयात कार्यान्वित आहे.

## ※ यशवंत सैन्य व पोलीस भर्तीपूर्व प्रशिक्षण केंद्र :

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित यशवंतराव चव्हाण महाविद्यालय अंबाजोगाई, माजी विद्यार्थी संघ यांच्या सहकार्याने महाविद्यालयामध्ये परिसरातील विद्यार्थ्यांची मागणी व स्पर्धात्मक वातावरण विचारात घेता. महाविद्यालयामध्ये सैन्य व पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र सुरु आहे.

**❊ कॅम्पस मुलाखती :**

नामांकित राष्ट्रीय आणि बहुराष्ट्रीय कंपन्यामधील नौकर–भरतीसाठी महाविद्यालयात कॅम्पस मुलाखती घेवून विद्यार्थ्यांना नौकऱ्यांची संधी उपलब्ध करून दिली जाते.

**❊ विद्यार्थी संसद :**

महाविद्यालयात वर्षभर अभ्यासक्रमोत्तर आणि अभ्यासक्रम पुरक जे जे उपक्रम राबविले जातात आणि विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते याचा हेतू विद्यार्थ्यांना सांस्कृतिक, बौद्धिक, शारीरिक आणि त्यांच्या सृजनशीलतेला संधी देवून त्यांचे यथायोग्य संवर्धन करण्यासाठी हे उपक्रम राबविले जातात. यामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग, क्रियाशील व विधायक रहावा यासाठी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ नुसार विद्यार्थी संसदेची स्थापना केली जाते.

**❊ पालक–शिक्षक संघ :**

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे पालकत्व वास्तविक शिक्षकांचेच आहे. ही भूमिका महाविद्यालय प्रामाणिकपणे पार पाडत आहे. परंतु विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा अहवाल त्यांच्या पालकांना देणेही तितकेच आवश्यक आहे. या हेतूने शिक्षक पालक संघाची स्थापना करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांसहीत पालक मेळाव्यांचे आयोजन करून पालकांशी सुसंवाद साधला जातो. पालक–शिक्षक संघाच्या माध्यमातून पुढील उपक्रम राबवले जातात : १) विद्यार्थ्यात शिक्षणाची आवड निर्माण करणे. २) विद्यार्थी महाविद्यालयात नियमित उपस्थित ठेवणे. ३) विद्यार्थी व पालकांच्या अडीअडचणी समजून घेणे. ४) विद्यार्थ्याने अभ्यासक्रमाशिवाय इतर उपक्रमांत सहभाग नोंदवणे.

५) विद्यार्थ्यांनी नियमितपणे घरी अभ्यास करणे. ६) पालकांची महाविद्यालयाबद्दलची मते जाणून घेवून विचारांचे आदान–प्रदान करणे

**❊ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्र :**

महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक या विद्यापीठाचे अभ्यासकेंद्र कार्यान्वित आहे. शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहिलेल्या विद्यार्थ्यांना, व्यक्तींना शिक्षण देवून पदवीधर होण्याची, आयुष्यात नव्याने उभारण्याची सुवर्ण संधी उपलब्ध करून दिली आहे. महाविद्यालयातील अभ्यासकेंद्रावर पूर्वतयारी, बी.ए. (मराठी/उर्दू) आणि बी.कॉम. (मराठी/इंग्रजी) अभ्यासक्रमांची सुविधा उपलब्ध आहे.

# ✻ कनिष्ठ महाविद्यालयातील अभ्यासक्रम ✻

## ✻ कला शाखा इयत्ता ११ वी व १२ वी विषय योजना

**ग्रुप 'अ' :**

**अनिवार्य विषय** : १. इंग्रजी २. पर्यावरणशास्त्र ३. शारिरीक शिक्षण

**द्वितीय भाषा** : ४. मराठी / हिंदी / पाली (कोणताही एक)

**ग्रुप 'ब' :** (कोनतेही दोन)

१. इतिहास २. अर्थशास्त्र ३. राज्यशासत्र ४. भूगोल ५. समाजशास्त्र

**ग्रुप 'क' :** (कोनताही दोन )

१. सहकार, २. संरक्षणशास्त्र, ३. शिक्षणशास्त्र

येथे

## ✻ वाणिज्य शाखा ११ वी, १२ वी

**ग्रुप 'अ'**

**अनिवार्य विषय** : १. इंग्रजी २. पर्यावरणशास्त्र व जलसुरक्षा
३. आरोग्य आणि शारिरीक शिक्षण

**द्वितीय भाषा** : ३. मराठी / हिंदी / पाली (कोणताही एक)

**ग्रुप 'ब' :** (कोणतेही चार)

१. पुस्तपालन व लेखाकर्म २. वाणिज्य संघटन ३.सचिवाची कार्यपद्धती
४. सहकार ५. अर्थशास्त्र

## ✻ विज्ञान शाखा ११ वी, १२ वी

**ग्रुप 'अ'**

**अनिवार्य विषय** : १. इंग्रजी २. पर्यावरणशास्त्र ३. शारिरीक शिक्षण

**द्वितीय भाषा** : ३. पाली

**ग्रुप 'ब' :** (ऐच्छिक विषय)

१. भौतिकशास्त्र २. रसायनशास्त्र ३. जीवशास्त्र ४. गणित

**ग्रुप 'क' :** ५. पीकशास्त्र/संगणकशास्त्र/इलेक्ट्रॉनिक्स (कोणताही एक)

**अत्यंत महत्वाची सूचना**

प्रवेश घेताना विद्यार्थ्याने एकदा निवडलेला विषय १२ वी उत्तीर्ण होईपर्यंत कोणत्याही परिस्थितीत बदलता येणार नाही.

# * विद्यार्थ्यांसाठी महत्वपूर्ण सूचना *

## * प्रवेशासंबंधी नियम :-

१) शासकीय नियमानुसार ११ वी (विज्ञान) वर्गात प्रवेशासाठी शास्त्र विषयात किमान ४० टक्के गुण असणे आवश्यक आहे. याची विद्यार्थ्यांनी/पालकांनी नोंद घ्यावी.

२) महाविद्यालय सर्व जातीजमातीच्या विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी खुले आहे. शासकीय नियमानुसार सर्व सर्व अभ्यासक्रमांना राखीव जागा राहतील.

३) विद्यार्थ्यांनी सर्व प्रकारची शुल्क दिल्याशिवाय व बोर्डातून त्याचे पात्रता प्रमाणपत्र आल्याशिवाय त्याचा प्रवेश पूर्ण समजला जाणार नाही.

१) अ) शाळा सोडल्याचा दाखला (मुळ व दोन सत्यप्रती) ब) गुणपत्रक व त्याच्या दोन प्रमाणित प्रती (मार्कमेमो) क) मागासवर्गीय विद्यार्थ्यांस जातीचे प्रमाणपत्र तसेच तहसिलदाराचे मागील वर्षाचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र ड) खुल्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी Economic Backup Class. Scholarship Merit Scholarship from Maha DBT Portal वर भरावे.

२) मागील वर्षाच्या शैक्षणिक सवलतींचा मंजुरी आदेश क्रमांक.

३) विद्यार्थ्यांनी आपले प्रवेश अर्ज भरताना प्राध्यापकाचा सल्ला व मार्गदर्शन घ्यावे. एकदा निवडलेल्या विषयात नंतर बदल करु नये.

४) महाविद्यालयात प्रवेश घेतांना (टी.सी. व मार्कमेमो) त्याच्या सत्यप्रती विद्यार्थ्यांनी स्वतःकडे ठेवाव्यात. मुळप्रती परत दिल्या जाणार नाही. याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

५) अन्य जिल्ह्यातून आलेल्या विद्यार्थ्यांनी मूळ दाखल्यावर संबंधित शिक्षणाधिकाऱ्याची स्वाक्षरी आणावी.

टीप :- एकदा प्रवेश घेतल्यानंतर कोणत्याही सबबीवर प्रवेश फीस परत मिळणार नाही.

## * परीक्षेस बसण्यासंबंधी नियम :-

१) प्रत्येक विषयात ७५ टक्के उपस्थिती असलेल्या विद्यार्थ्यांनाच परीक्षेस बसता येईल.

२) कॉलेजकडून घेतल्या जाणाऱ्या परीक्षेस उपस्थिती व प्रत्येक विषयास किमान उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

३) विद्यार्थ्यांने सर्व प्रकारचे शुल्क दिलेले असावे. ग्रंथालयाची पुस्तके परत केलेली असावीत.

## * विविध प्रकारच्या शिष्यवृत्त्या व आर्थिक सहाय्य नियम :-

अनुसूचित जाती (Schedule Castes) महार, मांग, चांभार वगैरे

अ) Maha DBT पोर्टलवर Online Form भरुन Hard Copy महाविद्यालयात सादर करणे आवश्यक आहे.

आ) जाती बद्दल प्रमाणपत्र कार्यकारी न्यायदंडाधिकारी याचे असणे आवश्यक आहे.

इ) अर्ज कार्यालयात दाखल करण्याची अंतिम तारीख सूचना फलकावर लावण्यात येईल. Sclorship online From न भरल्यास महाविद्यालयाची पुर्ण फिस भरावी लागेल.

ई) तिसरे अपत्य असल्यास फक्त फ्रीशीप मिळेल. शिष्यवृत्ती मिळणार नाही, ७५% पेक्षा जास्त

हजेरी असणे आवश्यक आहे.

छ) महाविद्यालयात प्रवेश घेण्यापूर्वी शिक्षणात खंड असल्यास खंडपत्र (गॅप सर्टिफिकेट) द्यावे लागेल.online From भरल्यानंतर -user ID व Password विद्यार्थ्यांनी व्यवस्थीत पणे ठेवावा. नसता होणाऱ्या नुकसानीस विद्यार्थी जबाबदार राहील.

**✻ फ्रीशिप सवलती संबंधी :–**

ज्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे पालक नोकरीत असतील त्यांना शिष्यवृत्ती ऐवजी फ्रीशिप मिळतो. फ्रीशिप सवलती संबंधीच्या अर्ज Maha Pbt . पोर्टलवर online भरावा गुणपत्रक, प्रमाणित प्रती, मागील वर्षाचे वडीलांचे / पालकांचे वार्षिक उत्पन्नाची मुळ प्रत जोडणे आवश्यक आहे. तसेच जातीच्या प्रमाणपत्राची सत्यप्रत डोमासाईड प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, आधार कार्डला मोबाईल लिंक आसावा बँक खात्यात आधार बदलल्यास आधार लिंक करावा. बँक खात्यास मोबाईल लिंक असावा.

**✻ भारत सरकारची शिष्यवृत्ती :–.**

**✻ राज्य सरकारची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती :–**

ज्या विद्यार्थ्यास इयत्ता १० वी मध्ये ८५ टक्क्याहून अधिक गुण मिळाले असतील व त्याने ११ वी मध्ये प्रवेश घेतलेला असल्यास त्यास राजर्षी शाहु महाराज गणवत्ता शिष्यवृत्ती मिळेल. मात्र या शिष्यवृत्ती धारकास पुढील प्रत्येक परीक्षेत कमीत कमी ६० टक्के गुण मिळविणे आवश्यक आहे. अर्ज करण्यासाठी अंतीम तारीख सूचना फलकात लावण्यात येईल. या शिष्यवृत्तीस पालकाच्या उत्पन्नाची अट लागू नाही. ज्या विद्यार्थ्यास पूर्वी शिष्यवृत्ती मिळत असेल त्यांनी प्रगती अहवाल भरुन कार्यालयात दाखल करावा.

सदरिल शिष्यवृत्ती Maha DBT पोर्टलवर online भरुन हाई कॉपी कार्यालयात सादर करावी.

शैक्षणिक , अर्थिक दृष्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती मिळेल.शिष्यवृती फॉर्म भरण्यासाठी विद्यार्थ्यांना हजेरी ७५ % पेक्षा जास्त असणे आवश्यक आहे.

**✻ राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती :–** (Webside : MahaDBTTT )

✻ गुणवंत विद्यार्थ्यांना दरवर्षी भारत सरकारतर्फे परीक्षेतील गुणवत्तेवर आधारित शिष्यवृत्त्या दिल्या जातात. चांगल्या गुणानुसार होणाऱ्या व राज्य सरकार कडून मंजूर झालेल्या शिष्यवृत्यांच्या संख्येनुसार गुणानुक्रमे वरचे नंबर मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांस ह्या शिष्यवृत्त्या दिल्या जातात.

✻ ही शिष्यवृत्ती घेणाऱ्या विद्यार्थ्याला दुसरी कोणतीही शिष्यवृत्ती स्विकारता येणार नाही.

✻ अर्ज करण्याची अंतिम तारीख सूचना फलकावर लावली जाईल.

✻ शिष्यवृत्ती फॉर्म भरण्यासाठी ७५ % पेक्षा जास्त हजेरी असणे आवश्यक आहे.अर्ज online भरणे आवश्यक

**✻ अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती :–** (Webside : MahaDBTTT )

शैक्षणिक वर्ष २००७–०८ पासून अल्पसंख्यांक समाजातील (मुस्लीम, पारशी, शिख, ख्रिश्चन, बौद्ध) गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकेत्तर शिष्यवृत्ती योजना केंद्र शासनाने सुरु केली आहे. त्याच संबंधीत समाजातील विद्यार्थीनी शिष्यवृत्ती अर्ज onlin Hard Copy कार्यालयात जमा करावी भरुन घ्यावा. पण अशा विद्यार्थ्यांना दुसरी कोणतीही शिष्यवृत्ती घेता येणार नाही. शिष्यवृत्ती फॉर्म

भरण्यासाठी ७५ % हजेरी असणे आवश्यक आहे.

विविध शिष्यवृत्ती व अर्ज करण्यासंबंधी माहिती बाबत सूचना महाविद्यालयातील सूचना फलकावर वारंवार लावण्यात येतील याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

## ❊ इ.बी.सी. सवलती संबंधी माहिती :– Maha DBT Portal

१) ज्या विद्यार्थ्यांचे आई – वडिलांचे / पालकांचे मागील वर्षाचे उत्पन्न रु.१,००,००० (एक लक्ष ) रु. पेक्षा जास्त नाही अशा विद्यार्थ्यास इ.बी.सी. सवलत दिली जाते. Maha DBT Portal वर ऑनलाईन भरून सर्व कागदपत्रे अपलोड करावे.

३) विद्यार्थी जर कॉलेजमध्ये नाव घालण्यापूर्वी, त्यापूर्वी कोणत्याही शाळेत अथवा महाविद्यालयात शिकत नसेल तर त्यास (गॅप सर्टिफिकेट) द्यावे लागते. मात्र इतर शुल्क निर्देशित तक्त्यानुसार भरावे लागेल.

४) तिसरे अपत्य असल्यास इ.बी.सी. सवलत मिळणार नाही याची नोंद घ्यावी.

५) गतवर्षीचा इ.बी.सी. मंजूरी आदेश क्रमांक आवश्यक आहे.

६) १) महाविद्यालयास सूचना न देता, प्रवेश रद्द न करता गैरहजर राहिल्यास अथवा इतर महाविद्यालयात प्रवेश घेतल्यास ही सवलत नामंजूर होते.विद्यार्थ्यांची हजेरी ७५ % हजेरी असेल त्यास शिष्यवृत्ती मिळेल.

२) ज्या विद्यार्थ्याचे प्रमाणपत्र ठराविक नमुन्यातील नसतील किंवा शासनाकडून अर्ज कोणत्याही कारणास्तव नामंजूर करण्यात आल्यास त्याची जबाबदारी विद्यार्थ्यावर व पर्यायाने पालकावर राहील.

७) वार्षिक परीक्षेचा फॉर्म व फीस न भरल्यास ही सवलत मिळत नाही. महाविद्यालयाची पूर्ण फिस भरावी लागेल.

## ❊ प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या पाल्यांना मिळणाऱ्या शैक्षणिक सवलती :–

१) प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या मुलांना शुल्क माफी सवलतीमध्ये शैक्षणिक शुल्क लॅबोरेटरी शुल्क, ग्रंथालय व प्रवेश शुल्काचा अंतर्भाव होतो. अन्य शुल्क विद्यार्थ्यास भरावे लागेल.

२) अर्जाचे नमुने दोन प्रतीत आणावेत.

३) या अर्जासोबत दाखला गट शिक्षणाधिकारी यांच्या सहीचा असावा. शाळेतील शिक्षकांसाठी संस्था चालकाचा असावा.

## ❊ स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांसाठी मिळणारी शैक्षणिक सवलत :–

सैनिक चिन, पाकिस्तान आक्रमणात शहीद किंवा अपंग झाले असतील त्यांच्या पाल्यांना

कोणत्याही उत्पन्नाची अट न धरता शुल्क माफीची सवलत दिली जाईल. ह्याबद्दल माहिती कार्यालयात मिळू शकेत. प्रवेश घेताना योग्यता प्रमाणपत्र जिल्हा सैनिक बोर्ड यांचे द्यावे.

### ✻ विविध शिष्यवृत्त्या व शैक्षणिक सवलती मिळण्यासाठी सर्वसाधारण नियम :-

१) कोणतीही शिष्यवृत्ती अथवा शैक्षणिक सवलत हवी असल्यास वेळेवर अर्ज करणे तसेच कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

२) कोणतीही शिष्यवृत्ती गुणानुक्रमे मिळत असल्यामुळे अर्ज केला की, शिष्यवृत्ती मिळतेच असे नव्हे, मात्र गुणवत्तेनुसार शिष्यवृत्ती मिळत असल्यामुळे कमी गुण घेणाऱ्या विद्यार्थ्यांस जर ती शिष्यवृत्ती मिळाली असेल तर कार्यालयात येवून विद्यार्थ्याने चौकशी करणे आवश्यक आहे.

३) शिष्यवृत्ती व शैक्षणिक सवलती अर्ज करण्यासाठी मार्कमेमोच्या सत्यप्रतीची आवश्यकतेनुसार प्रवेश घेण्यापूर्वी झेरॉक्स करुन स्वतःकडेच ठेवाव्यात.

४) विविध शिष्यवृत्ती व शैक्षणिक व शैक्षणिक सवलतीसाठी अर्ज पाठविण्याची अंतीम तारीख वेगळी असते. अर्ज मुदतीत द्यावेत. विद्यार्थी सूचना न पाहता अशावेळी चौकशी करतात त्यामुळे योग्य ती माहिती मिळवताना अडचण निर्माण होते.

५) नियमित उपस्थिती, परीक्षा व वर्तन या गोष्टी शिष्यवृत्ती व शैक्षणिक सवलतीसाठी आवश्यक आहे.

६) शिष्यवृत्ती व शैक्षणिक सवलती मिळविण्यासाठी महाविद्यालयाच्या व बोर्डाच्या परीक्षा देणे क्रमप्राप्त आहे. जे विद्यार्थी वार्षिक परीक्षा देणार नाहीत त्यांना वर्षभरात उचललेली संपूर्ण शिष्यवृत्ती अथवा शैक्षणिक शुल्क माफीची सवत शासनाकडे ताबडतोब परत करावी लागेल व तेवढी शुल्क विद्यार्थ्यांकडून वसूल करण्यात येईल.

.७) ज्या विद्यार्थ्यांची ७५ % पेक्षा जास्त हजेरी असेल तरच त्यास शिष्यवृत्ती मिळेल.

### ✻ गणवेश :-

११ वी १२ मधील विद्यार्थ्यांना गणवेश अनिवार्य आहे. गुरुवार शिवाय दररोज गणवेश घालणे आवश्यक आहे. कुठल्याही सबबीवरुन गणवेशाशिवाय परिसरात प्रवेश दिला जाणार नाही अथवा दंड आकारला जाईल.

### ✻ वर्ग चालू असताना पाळावयाचे नियम :-

✻ विद्यार्थ्यांनी व्हरांड्यात ये जा करु नये.

✻ दरवाजा वाजवून प्रवेश करु नये.

✻ वर्गातील विद्यार्थ्यांना परस्पर बाहेर बोलावू नये.

✻ वर्गात प्रत्येकाने शांतता पाळली पाहिजे.

✻ वर्गातील विद्यार्थ्यांनी संबंधीत प्राध्यापकाच्या परवानगीशिवाय वर्ग सोडू नये.

✻ ज्या विद्यार्थ्यास तास नसतील अशा विद्यार्थ्यांनी अभ्यासिकेत बसून वेळेचा सदुउपयोग करावा.

✻ पालकांनी आपल्या पाल्यांना भेटण्यासाठी परस्पर वर्गावर न जाता कार्यालयाशी संपर्क साधावा.

### ✻ पालकांचा मेळावा :-

११ वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांच्या पालकांचा मेळावा वर्षातून दोन वेळा घेण्यात येतो. त्यासाठी

पालकांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे व विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत पालकांनी महाविद्यालयाशी संपर्क साधून माहिती घेणे आवश्यक आहे.

## ※ ओळखपत्र एक महत्वाची बाब :-

विद्यार्थ्यांना ओळखपत्र ग्रंथालयातून मिळेल. त्यावर आपला फोटो लावावा व प्राचार्यांची / उपप्राचार्यंची सही घ्यावी. ग्रंथालय, प्रयोगशाळा, खेळाचे साहित्य याबाबत देवघेव करण्यासाठी ओळखपत्र आवश्यक आहे. ओळखपत्राशिवाय प्रयोगशाळेत प्रवेश मिळणार नाही.

१) ज्या विद्यार्थ्याजवळ ओळखपत्र (आयडेंटी कार्ड) असेल त्यास ग्रंथालयातून पुस्तके मिळवील. ओळखपत्र हरवल्यास नवीन घेण्यासाठी रुपये ५०/- शुल्क पडेल. शिवाय प्रत्येकास ग्रंथालय कार्ड मिळेल.

२) कार्डवर पुस्तके मिळतील. कार्ड हरवल्यास नवीन कार्डास दंड रु.१०/- पडेल. एका कार्डवर एकावेळी एक पुस्तक मिळेल.

३) सुट्ट्यामध्ये पुस्तके दिली जाणार नाही. सर्व पुस्तके परीक्षा सुरु होण्यापूर्वी दिलेल्या मुदतीस परत करावी लागतील.

## ※ महाविद्यालय शाळा सर्वसाधारण दाखला (टी.सी):-

सर्वसाधारण नियम :-

१) विद्यार्थी महाविद्यालयात प्रवेश घेतात त्या वेळी त्यांना सोबत मार्कमेमो, टी.सी. देणे आवश्यक आहे. काही विद्यार्थी टी.सी. नंतर देतो असे सांगून तात्पुरता प्रवेश घेतात व दुसरीकडे प्रवेश घेतात. एकाच वेळी दोन ठिकाणी प्रवेश घेणे बेकायदेशीर आहे. विद्यार्थ्याने असे न करता सोबत टी.सी. आणावा. अन्यथा त्याचा प्रवेश अंतीम समजला जाणार नाही. तसेच अन्य ठिकाणी प्रवेश घ्यावयाचा असल्यास कार्यालयास स्पष्ट कल्पना द्यावी व किमान १२ दिवसांचे आतच प्रवेश रद्द करावा अन्यथा तो याच महाविद्यालयात राहणार आहे असे समजून फीस वसूल करण्यात येईल.

२) प्रवेश घेतल्यानंतर काही विद्यार्थी पूर्व सूचना न देता महाविद्यालय सोडून घरी बसतात व त्यामुळे त्यांना मिळालेली शिष्यवृत्ती व शैक्षणिक सवलत मिळण्यास ते अपात्र ठरतात. त्यामुळे महाविद्यालयास होणारा भुर्दंड आम्ही विद्यार्थ्यांकडून वसूल करतो. वरील विद्यार्थ्याने प्राचार्यांशी संपर्क साधून आपली अडचण काय आहे याची स्पष्ट कल्पना देवूनच तसा अर्ज करावा. महाविद्यालय सोडण्याचा निर्णय परस्पर घेवू नये.

३) महाविद्यालयातील सर्व फीस भरल्याशिवाय त्याला महाविद्यालय सोडण्याचा दाखला दिला जात नाही. तेव्हा विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या नियमाचे काटेकोरपणे पालन करावे. नियमित उपस्थिती, सद्ववर्तन व परीक्षा चाचणी, वार्षिक इत्यादी बाबींकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

विज्ञान शाखेकडे सर्व विषयांसाठी इंग्रजी माध्यम राहील. तथापि विद्यार्थ्यांना विषय समजणे सोपे जावे म्हणून प्राध्यापक आवश्यकतेनुसार मराठीचा वापर करतील. शासकीय आदेशानुसार प्रवेशासाठी टी. सी. अर्ज दिल्यानंतर ३ दिवसात टि.सी. मिळेल.

विज्ञान विषयात किमान ४० टक्के गुण असणे आवश्यक आहे. याची नोंद पालकांनी घ्यावी. ११ वी १२ वी विज्ञान या अभ्यासक्रमासाठी खालील विषय विद्यार्थ्यांना द्यावे लागतील.

## ✲ ११ वी निकालाबाबत :-

११ वी परीक्षेचा निकाल वर्षभरात होणाऱ्या परीक्षेवर अवलंबून असतो. पालकांनी आपल्या पाल्याच्या प्रगतीकडे वर्षभरात लक्ष देणे आवश्यक आहे.

इ. ११ वी मध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच १२ वी व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश देण्यात येईल.

११ वी परीक्षेचा निकाल वर्षात होणाऱ्या परीक्षेवर अवलंबून असतो.

अ) चाचणी, गृहपाठ, प्रथम सत्र परीक्षा — १०० पैकी गुण

२५ + २५ + ५०

ब) द्वितीय सत्र परीक्षा प्रात्यक्षिक / तोंडी परीक्षा — १०० पैकी गुण

७० / ८० + ३० / २०

प्रत्येक विषयांचे अंतीम गुण ठरविताना वरील अ आणि ब ची सरासरी काढली जाते.

११ वी चा निकाल $\left(\frac{\text{अ} + \text{ब}}{२}\right)$ या सुत्रानुसार तयार होवून जाहिर केला जातो.

१२ वी वर्गासाठी महाविद्यालयाच्या वतीने चाचणी परीक्षा घेतल्या जातात. प्रत्येक विद्यार्थ्याने सर्व परीक्षा देणे आवश्यक असून प्रत्येक विषयात पास होवून प्रगती दाखविणे आवश्यक आहे. अनुपस्थित व निकाल राखीव असणाऱ्या विद्यार्थ्यांना दंड आकारला जाईल.

म.शि.प्र. मंडळ संचलित

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई

कनिष्ठ महाविद्यालय शैक्षणिक वर्ष २०२२-२०३३ साठी ११ व १२ वी

कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांकडून आकारण्यात येणारी शुल्क २०२२-२३

| | | अनुदानित | | | | | | विनाअनुदानित | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr.No. | Fee Type | XI,XII,Arts | | | XI,XII,Comm. | | | XI,XII,Sci. | | |
| | | FF | EBC | GOI | FF | EBC | GOI | Xi /XII Science GOI | XI Science FF | XII Science FF |
| 1 | Registration Fees | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 150 | 150 | 150 |
| 2 | Admission Fees | 16 | 0 | 0 | 16 | 0 | 0 | 0 | 16 | 18 |
| 3 | Tuition Fees | 192 | 0 | 0 | 192 | 0 | 0 | 0 | 192 | 216 |
| 4 | Term Fees | 32 | 0 | 0 | 32 | 0 | 0 | 0 | 32 | 36 |
| 5 | Home Examination | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 6 | Identity Card | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 |
| 7 | Development Fund | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 2000 | 2000 | 2000 |
| 8 | Library Fees | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 200 | 200 | 200 |
| 9 | Sports Fees | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 10 | Laboratory Fees | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 200 | 200 |
| 11 | Lab Brakage | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 50 | 50 |
| 12 | Gathering Fees | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| | **Total Fees** | **620** | **380** | **380** | **620** | **380** | **380** | **2570** | **3060** | **3090** |

| Other Fees | | |
|---|---|---|
| 1 | LC OR TC FEES | 150 |
| 2 | BONAFIED FEES | 20 |
| 3 | MAGAZINE | 50 |
| 4 | ATTEMPAT CERTIFICATE | 20 |
| 5 | PASSING CERTIFICAT | 20 |
| 6 | ENTRY EXODUS CERTIFICATE | 20 |
| 7 | MIGRATION TC FEES | 300 |
| 8 | DUPLICATE TC FEES | 1000 |
| 9 | MKCL TC | 50 |
| 10 | PG CET FEES | 200 |
| 11 | LOSS OF BOOKS FINE | 0 |
| 12 | MISCELLANEOUS RECEIPT | 0 |
| 13 | SALE OF PROSPETUS | 0 |
| 14 | PRACTICAL BOOK FEES | 0 |
| 15 | PROJECT BOOK FEES | 0 |
| 16 | PROGRESS REPORT FEES | 0 |
| 17 | RESEARCH CENTER TUTION FEES | 0 |
| 18 | RESEARCH CENTER DEVELOPMENT FUND | 0 |

*** XI, XII (Sci. Biofocal) Non-Granted ***

| Sr. No. | Fee Type | XI Sci. | XII Sci. |
|---|---|---|---|
| 1 | Computer Science Fees | 5000 | 5000 |
| 2 | Electronics Fees | 5000 | 5000 |
| 3 | Crop Science Fees | 5000 | 5000 |

# * विद्यार्थ्यांसाठी महत्वपूर्ण सूचना *

*** प्रवेशासंबंधी :**

१. सर्व प्रवेश संगणकीकृत केले जातील. विद्यार्थ्यांनी आपला कायम नोंदणी क्रमांक वापरावा.
२. विद्यार्थ्यांनी आपल्या मुळ कागदपत्राच्या पुरेशा सत्यप्रती स्वतःकडे ठेवाव्यात.
३. विद्यार्थ्यांनी निर्धारित वेळेत आवश्यक कागदपत्रे (स्कॉलरशीप फॉर्म/इ.बी.सी.फॉर्म/पात्रता प्रमाणपत्र/स्थलांतर प्रमाणपत्र ) संबंधितांकडे सादर करावीत.
४. सर्व प्रवेश तात्पुरते असतील. प्राचार्यांच्या अधिकारात पडताळणी झाल्यानंतर प्रवेश कायम होतील.
५. विद्यार्थ्यांनी प्रवेशासंबंधी सर्व पावत्या जपून ठेवाव्यात. प्रवेश रद्द करताना त्याशिवाय कोणतेही देय शुल्क परत मिळणार नाही.
६. विद्यार्थ्यांनी प्रत्येक सत्राला प्रवेश घेणे अनिवार्य आहे.
७. प्रवेश फॉर्मवर एकदा निवडलेले विषय बदलता येणार नाहीत.

*** नियमित उपस्थिती संबंधी :**

१. ७५ टक्के उपस्थिती अनिवार्य आहे. त्याशिवाय परीक्षा फॉर्म स्विकारला जाणार नाही.
२. सतत गैरहजर राहिल्यास प्रवेश रद्द करण्यात येईल.
३. वर्ग चाचण्या व गृहपाठ, सत्रपरीक्षा बंधनकारक राहतील.
४. वर्षभरातील प्रगती पाहून वेळोवेळी पालकांशी सुसंवाद साधला जाईल.
५. महाविद्यालय व महाविद्यालयाच्या परिसरात गैरवर्तनाला सक्त मनाई आहे.

*** ग्रंथालयासंबंधी :**

१. पुस्तकांच्या देवाण–घेवाणीसाठी ग्रंथालय कार्ड व ओळखपत्र आवश्यक आहे.
२. ग्रंथालय कार्डावर एकावेळी २ पुस्तके आठवड्यासाठी मिळतील.
३. ओळखपत्र प्रवेश पूर्ण झाल्यावर घ्यावे लागेल.
४. दुसरे ओळखपत्र हवे असल्यास ५० रु. शुल्क भरावे लागेल.
५. निर्धारित वेळेच्या आत पुस्तके परत न केल्यास एका पुस्तकासाठी दर दिवस १ रु. प्रमाणे दंड आकारला जाईल.
६. पुस्तके घेताना तपासून घ्यावेत.
७. पुस्तके फाटल्यास वा गहाळ केल्यास पुस्तकांची किंमत दिडपट भरावी लागेल.
८. पुस्तक पेढीतून पुस्तके मिळविण्यासाठी स्वतंत्र अर्ज करावेत.
९. वार्षिक परीक्षेपुर्वी पुस्तके परत करावीत अथवा पुस्तकांच्या किंमती इतके अनामत रक्कमा जमा करून पुस्तके घेता येतील.
१०.संदर्भग्रंथ, मासिके, वृत्तपत्रे, वाचन कक्षात उपलब्ध होतील ते घरी घेवून जाता येणार नाहीत.

*** शिस्त व आचरणासंबंधी :**

१. स्वयंशिस्तः उत्तम शिस्त.

२. विद्यार्थ्यांनी सर्वांशी सौजन्याने वागावे.
३. विद्यार्थ्यांचे महाविद्यालयातील व बाहेरील वर्तन महाविद्यालयाच्या प्रतिष्ठेस बाधा आणणारे नसावे.
४. विद्यार्थ्यांनी ओळखपत्र नेहमी सोबत ठेवावे.
५. महाविद्यालयाबाहेरील विद्यार्थ्याना सोबत आणू नये.
६. सर्व विद्यार्थ्यांनी सर्व तासिकांना उपस्थित राहवे. तासिका नसताना ग्रंथालय अभ्यासिकेचा उपयोग करावा.
७. सर्व विद्यार्थ्यांनी बाह्य घटकांचा महाविद्यालयावर प्रभाव आणि परिणाम होणार नाही याची दखल घ्यावी.
८. महाविद्यालयाच्या परिसरात धुम्रपानास सक्त मनाई आहे.
९. महाविद्यालयाच्या परिसरात मोबाईल वापरास सक्त मनाई आहे.
१०. जाणीवपूर्वक महाविद्यालयाच्या व्याख्याने व इतर उपक्रमात अडथळा केल्यास नियमानुसार कार्यवाही केली जाईल.
११. तासिका सुरु असतना व्हरांड्यात फिरु नये.
१२. परिसर, इमारत व फर्निचर यांची नासधूस करु नये.
१३. आपली वाहने पार्किंग मध्येच लावावीत.
१४. वरील सर्व शिस्त व आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे, न केल्यास नियमानुसार कार्यवाही करण्यात यईल.

# ⁕ विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, इबीसी व इतर सवलती ⁕

## ⁕ भारत सरकार शिष्यवृत्ती : Maha DBT Portal वरुन भरावे

शिष्यवृत्ती व शुल्क सवलती विद्यार्थ्यांना मिळण्यासाठी खालील अटी पूर्ण केल्या पाहिजेत.

१. एकापेक्षा जास्त सवलतीचा फायदा विद्यार्थ्यांना घेता येणार नाही. जास्तीत जास्त फायदा असणारी सवलत विद्यार्थ्यांना दिली जाईल.

२. जातीचे प्रमाणपत्र व आवश्यक कागदपत्रे सादर केल्यासच शिष्यवृत्तीचा फायदा मिळेल.

३. नियमित उपस्थिती आवश्यक आहे.

४. परीक्षा फॉर्म न भरल्यास विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती मिळणार नाही.

५. परीक्षा शुल्क महाविद्यालय भरेल.

६. महाविद्यालयाच्या सर्व परीक्षांत विद्यार्थी उत्तीर्ण झाला पाहिजे.

७. अभ्यासातील प्रगती व विद्यार्थ्यांची वर्तणूक समाधानकारक असली पाहिजे.

८. अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त जाती, विशेष मागासवर्ग, इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना ही सवलत मिळेल.

९. विहीत नमुन्याचे अर्ज महाविद्यालयाच्या कार्यालयात निःशुल्क मिळतील आणि अर्ज ऑनलाईन भरावेत.

१०. प्रवेश घेण्यापूर्वीच्या वर्षी जर विद्यार्थी शिकत नसेल तर त्यास गॅप सर्टिफिकेट (शैक्षणिक खंड प्रमाणपत्र) द्यावे लागेल.

११. पालकांचे उत्पन्न रु. २,००,०००/– रु. पेक्षा जास्त नसावे.

१२. भारत सरकार शिष्यवृत्तीसाठी बँकेत (महाराष्ट्र बँक किंवा राष्ट्रीयकृत बँका) खाते उघडणे आवश्यक आहे.

१३. महाविद्यालयातील मैत्री संघास सहकार्य करावे.

## ⁕ शासकीय आर्थिक सवलती आणि इ.बी.सी. : Maha DBT Portal वर सर्व शिष्यवृत्ती भरता येतील.

राज्य सरकारकडून शासकीय योजनाद्वारे पात्र विद्यार्थ्यांना सवलती उपलब्ध आहेत.

१. आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांना शुल्क सवलत.

२. संरक्षण खात्यातील सैनिकांच्या मुलांना मिळणारी सवलत.

३. स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलांना मिळणारी शुल्क सवलत.

४. शासकीय खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती.

५. शालेय व उच्च माध्यमिक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या मुलांना शुल्क सवलत.

६. दहावी मध्ये ७५ टक्के गुण मिळवलेल्या अनुसूचित जातीच्या व भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांना

भारत सरकार शिष्यवृत्तीच्या व्यतिरिक्त राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती रु.३००० वार्षिक मिळेल. त्याकरिता कार्यालयात विचारणा करावी.

७. सर्व प्रवर्गातील अपंग विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासनाकडून अपंग शिष्यवृत्तीचा लाभ मिळेल. त्याकरिता कार्यालयात विचारणा करावी. अपंगत्व ४० टक्के असावे.

**(टीप : सदरील शुल्क सवलतींसाठी संबंधीतांनी कार्यालयाशी संपर्क साधावा.)**

## * विविध वर्गातील प्रवेशासाठीचे आरक्षण *

सर्व वर्गांसाठी प्रवेश सर्वसाधारणपणे गुणवत्तेच्या आधारे देण्यात येतील. नाव नोंदणीची मुदत संपल्यानंतर एक आठवड्याच्या आत वर्गनिहाय गुणवत्ता याद्या प्रसिद्ध केल्या जातील. सर्व वर्गातील प्रवेश मंजूर तुकड्यांतील संख्येप्रमाणे दिले जातील. शासकीय निर्णयानुसार ५०% जागा राखीव राहतील.

| अ.क्र. | प्रवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | १३ % |
| २ | अनुसूचित जमाती | ७ % |
| ३ | विमुक्त जाती (अ) | ३ % |
| ४ | भटक्या जमाती (ब) | २.५ % |
| ५ | भटक्या जमाती (क) | ३.५ % |
| ६ | भटक्या जमाती (ड) | २ % |
| ७ | विशेष मागास प्रवर्ग | २ % |
| ८ | इतर मागास प्रवर्ग | १९ % |
| ९ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | १० % |
| १० | खुला प्रवर्ग | ३८ % |

# * गुणवंत विद्यार्थ्यांसाठी बक्षीस योजना *

## * महाविद्यालयाचे पारितोषिक

यशवंत विद्यार्थी (**The Best Student of the Year**) : महाविद्यालयातील एक विद्यार्थी व एक विद्यार्थीनी एकूण शैक्षणिक कारकीर्द पाहून यशवंत विद्यार्थी पुरस्कारासाठी निवडला / निवडली जाईल. महाविद्यालयातर्फे प्रत्येकी ५०१/– रु. चे पारितोषिक व स्मृतिचिन्ह सन्मानपूर्वक प्रदान केले जाईल.

## * महाविद्यालयातील प्राध्यापकांमार्फत विषयनिहाय पारितोषिक योजना

१) कै.सोपानराव शिंदे सासऱ्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ – प्रा.डॉ.मुकुंद राजपंखे यांच्याकडून – १२ वर्गातून इंग्रजी विषयात ७५% पेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांस २०१/– रु. व प्रशस्तिपत्र

२) कै. अन्नपूर्णाबाई गोजमुंडे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ – प्रा.श्रीमती ए.बी.बरुरे यांच्याकडून १२ वी वर्गातून इंग्रजी विषयात सर्वात जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यास २०१/– रु. व प्रशस्तिपत्र.

३) प्रा.आर.बी.देवरे यांच्याकडून – १२ वी वर्गातून पाली विषयात सर्वप्रथम येणाऱ्यास ५०१/– रु. व प्रशस्तिपत्र.

४) प्रा.पी.के.जाधव यांच्याकडून – १२ वी कला वर्गातून इतिहास विषयात सर्वप्रथम येणाऱ्यास ५०१/– रु. व प्रशस्तिपत्र.

५) प्रा.पी.एस.जगताप यांच्याकडून – १२ वी वर्गातून सहकार विषयात सर्वप्रथम येणाऱ्यास ५०१/– रु. व प्रशस्तिपत्र.

६) प्रा.श्रीमती पाटील एस.बी. यांच्याकडून – १२ वी वर्गातून अर्थशास्त्र विषयात सर्वप्रथम येणाऱ्यास ५०१/– रु. व प्रशस्तिपत्र.

७) प्रा.श्रीमती पाटील.एस.बी. यांच्याकडून – १२ वी वाणिज्य वर्गातून सचिवाची कार्यपद्धती विषयात सर्वप्रथम येणाऱ्यास ५०१/– रु. व प्रशस्तिपत्र.

८) जाधव रमेश गोवर्धन. यांच्याकडून – १२ वी कला वाणिज्य व विज्ञान शाखेतुन प्रथम येणाऱ्यास ५०१/– रु. व प्रशस्तिपत्र. (कै.गोवर्धन निवृत्ती जाधव यांच्या स्मृति प्रित्यर्थ)

९) लक्ष्मण लिंबाजी कलबुर्गे यांच्या तर्फे फिजीक्स विषयात प्रथम येणाऱ्यास ५०१/– रु. व प्रशस्तिपत्र.

१०) प्राध्यापक कांबळे राहुल मुरलीधर यांच्या तर्फे विज्ञान शाखेत पाली विषयामध्ये प्रथम येणाऱ्यास रु. ३०१/– व प्रशस्तिपत्र

## * कनिष्ठ महाविद्यालयीन उपक्रमांचे वार्षिक नियोजन *

| अ.क्र. | महिना | उपक्रम |
|---|---|---|
| १ | १ जूलै ते १५ सप्टेंबर २०२१ | प्रवेश पक्रिया (११ वी, १२ वी) |
| २ | १ जुलै २०२१ | नियमित तासिका सुरु |
| ३ | सप्टेंबर २०२१ | पहिली घटक चाचणी व गृहपाठ |
| ४ | सप्टेंबर २०२१ पासून | जादा तासिका (दुपारी ३ ते ६) |
| ५ | डिसेंबर २०२१ | प्रथम सत्र परीक्षा |
| ६ | नोव्हेंबर २०२१ | दिवाळी सुट्ट्या जादा तासिका (१२ वी वर्गासाठी) |
| ७ | जानेवारी २०२२ | दुसरी घटक चाचणी व गृहपाठ |
| ८ | ३१ जानेवारी २०२२ | १२ वर्गाचे अभ्यासक्रम पूर्ण करणे. |
| ९ | जानेवारी २०२२ | बोर्ड पॅटर्ननुसार दोन सराव परीक्षा (१२ वी) |
| १० | फेब्रुवारी २०२२ | बोर्ड पॅटर्ननुसार एक सराव परीक्षा (१२ वी) |
| ११ | एप्रिल २०२२ | द्वितीय सत्र परीक्षा (११ वी) |
| १२ | एप्रिल २०२२ | ११ वी वर्गाचे स्पेशल क्लासेस |
| १३ | १ मे २०२२ | ११ वी वर्गाचे निकाल |
| १४ | जून २०२२ | बक्षीस वितरण कार्यक्रमाचे आयोजन (१२ वी बोर्ड परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी) |

**✻ कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद ✻**

| | | |
|---|---|---|
| १) | प्रा. पी. के. जाधव (उपप्राचार्य) | इतिहास, समाजशास्त्र |
| २) | प्रा. जी. एस. माने | इंग्रजी |
| ३) | मराठी/पर्यावरणशास्त्र | प्रा. डॉ. एस. बी. पाटील |
| ४) | प्रा. डी. डी. चांदणे | हिंदी,समाजसास्त्र |
| ५) | प्रा. आर. बी. देवरे | पाली/पर्यावरणशास्त्र |
| ६) | प्रा. एस. डी. जाधव | संरक्षणशास्त्र |
| ७) | प्रा. पी. एस. जगताप (पर्यवेक्षक) | सहकार |
| ८) | प्रा. श्रीमती एस. बी. पाटील | वाणिज्य |
| ९) | प्रा. आर.आर. पाटील | अर्थशास्त्र |
| १०) | प्रा. डॉ. डी. डी. खेबडे | शिक्षणशास्त्र |

**✻ कनिष्ठ महाविद्यालयीन विज्ञान विभाग ✻**

## प्राध्यपक वृंद

| | | |
|---|---|---|
| १) | प्रा. कलबुर्गे एच.एल. (उपप्राचार्य) | भौतिकशास्त्र (Physics) |
| २) | प्रा. श्रीमती आर.बी. पंडित | रसायनशास्त्र (Chemistry) |
| ३) | प्रा.आर.बी. गोरे | रसायनशास्त्र (Chemistry) |
| ४) | श्रीमती टी.पी. जाधव | रसायनशास्त्र (Chemistry) |
| ५) | प्रा.एस.एस. औंढे | भौतिकशास्त्र (Physics) |
| ६) | प्रा.एल.डी. सुर्यवंशी | भौतिकशास्त्र (Physics) |
| ७) | प्रा. श्रीमती यु.ए. अन्सारी | जीवशास्त्र (Biology) |
| ८) | प्रा. श्रीमती एम.आर तौर | जीवशास्त्र (Biology) |
| ९) | प्रा. श्रीमती आर.ए. रांजवण | गणित (Mathematics) |
| १०) | प्रा. श्रीमती एम.व्ही.पाटील | गणित (Mathematics) |
| ११) | प्रा. आर.एम. कांबळे | पाली (Pali) |

## ✻ प्रशासकीय कर्मचारी वृंद ✻

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. एम. जे. कांबळे | – | कार्यालय अधिक्षक |
| २) | श्री. एस. व्ही. दणके | – | मुख्य लिपीक |
| ३) | श्री. एन. जी. कातळे | – | वरिष्ठ लिपीक |
| ४) | श्री. एस. ए. कापसे | – | कनिष्ठ लिपिक |
| ५) | श्री. व्ही. यु. बोराडे | – | कनिष्ठ लिपिक |
| ६) | श्री. आर. जी. जाधव | – | ग्रंथालय परिचर |
| ७) | श्री. बी. ए. खंदारे | – | ग्रंथालय परिचर |
| ८) | श्री. व्ही. एम. काकुळते | – | ग्रंथालय परिचर |
| ९) | श्री. एस. एल. घाडगे | – | सेवक |
| १०) | श्री. आर. आर. सरवदे | – | सेवक |

## ✻ विद्यार्थी संपर्क सेवा ✻

### डॉ. शिवदास शिरसाठ
**प्राचार्य**

**प्रा. कलबुर्गे एच. एल.** (उपप्राचार्य)
मो. 9763999400

**प्रा. पी. के. जाधव** (उपप्राचार्य)
मो. 9420397901

**मा. प्रशांत जगताप** (पर्यवेक्षक)
मो. 9422082351

**प्रा. श्रीमती टी.पी.जाधव**
मो. 9422085622

**प्रा. सौ. पाटील एस. बी.**
मो. 7972592609

**प्रा. सौ. माने जी. एस.**
मो. 9580200200

**प्रा. डी.डी.खेबडे**
मो. 9405384057

**प्रा. एस.एस.औंढे**
मो. 7020657027

यशवंतराव चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंबाजोगाई

# मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबाद

## केंद्रीय कार्यकारिणी

| | |
|---|---|
| मा.आ. श्री. प्रकाश सुंदरराव सोळंके | अध्यक्ष |
| मा.आ. श्री. अमरसिंह शिवाजीराव पंडित | उपाध्यक्ष |
| मा.श्री. शेख सलीम शेख अहेमद | उपाध्यक्ष |
| मा.आ. श्री. सतीश भानुदासराव चव्हाण | सरचिटणीस |
| मा.श्री. अनिल सखाराम नखाते | सहचिटणीस |
| मा.श्री. प्रभाकर माणिकराव पालोदकर | सहचिटणीस |
| मा.श्री. डॉ. अविनाश दौलतराव येळीकर | कोषाध्यक्ष |
| मा.श्री. लक्ष्मणराव एकनाथराव मनाळ | सदस्य |
| मा.श्री. मोहन विनायकराव सावंत | सदस्य |
| मा.श्री. हेमंत रावसाहेब जामकर | सदस्य |
| मा.श्री. विवेकानंद दत्तात्रय भोसले | सदस्य |
| मा.श्री. आप्पासाहेब रामकृष्ण पाटील | सदस्य |
| मा.श्री. भारत भाऊसाहेब सोळुंके | सदस्य |
| मा.श्री. त्रिंबकराव तुळशीराम पाथ्रीकर | सदस्य |
| मा.श्री. दत्तात्रय ज्ञानोबा पाटील | सदस्य |
| मा.श्री. डॉ. प्रकाश आसाराम भांडवलदार | सदस्य |
| मा.श्री. विश्वास भारत पाटील | सदस्य |
| मा.श्री. विजय निळकंठराव सोळंके | सदस्य |
| मा.श्री. कल्याण भानुदासराव तुपे | सदस्य |

## महाविद्यालय विकास समिती

| | |
|---|---|
| मा.आ.श्री. प्रकाशराव सुंदरराव सोळंके | अध्यक्ष |
| मा.आ.श्री. सतीश भानुदासराव चव्हाण | सरचिटणीस |
| मा.श्री. दत्तात्रय ज्ञानोबा पाटील | सदस्य |
| मा.श्री. रमेशराव बाबुरावजी आडसकर | सदस्य |
| मा.श्री.डॉ. नरेंद्र हिरालाल काळे | सदस्य |
| मा.श्री. वसंतराव भगवानराव मोरे | निमंत्रित सदस्य |
| मा.श्री.डॉ. अण्णासाहेब शंकरराव जाधव | निमंत्रित सदस्य |
| मा.श्री.प्रा. श्रीपती किशनराव जोगदंड | निमंत्रित सदस्य |
| मा.श्री. अमर दगडुसाहेब देशमुख | निमंत्रित सदस्य |
| मा. श्रीमती प्रतिभा प्रकाशराव देशमुख | निमंत्रित सदस्य |
| मा.श्री. रणजित बालासाहेब लोमटे | निमंत्रित सदस्य |
| मा.श्री. सय्यद पाशु करीम | निमंत्रित सदस्य |
| मा.डॉ. धर्मराज बाबुराव तांदुळजेकर (विभाग प्रमुख शिक्षक प्रतिनीधी) | सदस्य |
| मा.डॉ. मुकुंद शंकरराव राजपंखे (IQAC प्रतिनीधी) | सदस्य |
| मा.डॉ. अहिल्या भारतराव बरुरे (महिला शिक्षक प्रतिनीधी) | सदस्य |
| मा.डॉ. अरविंद अंबादासराव घोडके (शिक्षक प्रतिनीधी) | सदस्य |
| मा.डॉ. दिलीप ज्ञानोबा भिसे (शिक्षक प्रतिनीधी) | सदस्य |
| मा. प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ | सदस्य सचिव |

# औरंगाबाद विभागात यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचा वाणिज्य शाखेचा १००% निकाल असलेले एकमेव महाविद्यालय

| कला प्रथम | वाणिज्य प्रथम | विज्ञान प्रथम |
|---|---|---|
| 89.13 % निकाल | 100% निकाल | 96.50% निकाल |
| कला शाखा | वाणिज्य शाखा | विज्ञान शाखा |
|  |  |  |
| शिंपले प्रिती ज्ञानोबा | कारंडे सलोनी विकास | शेटे आर्जुन संजय |
| 79.83% | 86.00% | 92.66% |

**१० वी, १२ वी व परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे**

# हार्दिक अभिनंदन !

### * महाविद्यालयाची ठळक वैशिष्ट्ये *

- यशवंत पॅटर्न अंतर्गत ११ वी, १२ वी वर्गांसाठी स्पेशल क्लासेसची सुविधा.
- ११ वी, १२वी कला वर्गांसाठी पाली, भूगोल, शिक्षणशास्त्र व संरक्षणशास्त्र विषयांची सुविधा.
- ११ वी, १२वी विज्ञान वर्गांसाठी पीकशास्त्र, संगणकशास्त्र आणि इलेक्ट्रॉनिक्स या विषयांची सोय.
- विद्यार्थी, विद्यार्थीनी व प्राध्यापकांसाठी स्वतंत्र वाचन कक्षासह वैचारिक ग्रंथांनी सुसज्ज ग्रंथालय.
- सर्व सुविधापूर्ण यशवंत व्यायामशाळा आणि सांस्कृतिक सभागृह.
- अत्याधुनिक सुसज्ञ संगणक व विज्ञान विषयांच्या प्रयोगशाळा.
- मुलां-मुलींसाठी स्वतंत्र व सुसज्ञ वस्तिगृह.
- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे अभ्यासकेंद्र.
- महाविद्यालयाचा १२ एकर निसर्गरम्य परिसर.

आई ऑफसेट/९१७०९४८५४४